# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०१.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३१.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ३८ केसेसमध्ये ४० ईसमांवर कारवाई करून ४८,६०५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून १,४४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४८१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,३४,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) सोनेगांव पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ३१.०५.२०२६ चे २०.०५ वा. चे सुमारास, सोनेगांव पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, इंद्रप्रस्थ नगर, पाण्याचे टाकीजवळ, नागपुर येथे एक ईसम पोलीसांना पाहुन पळताना दिसुन आला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुचित रविप्रकाश चहांदे, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. ०३, इंद्रप्रस्थ नगर, सोनेगांव, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १०/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सोनगांव येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय.डी.सी. विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, पोउपनि. विक्रांत कारटकर, राजेश राठोड पोहवा. राजेश व मंगेश यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हिंगणा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा पुतण्या नामे आकाश विठ्ठल पिंपळे, वय २९ वर्षे, रा. बिबिसावळी, कान्होलीबारा, हिंगणा, जि. नागपुर हा त्याचे शेतातील विहीरीचे काम पाहण्याकरीता गेला होता. तो त्याचे स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ३१ डि.ए. ९४५२ ने घरी परत येत असता, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, बिबिसावळी गांव ते बिबिफाटा रोडचे दरम्यान, तुषार झाडे चे शेताजवळ समोरून येणाऱ्या टाटा एन्ट्रा चारचाकी गाडी क्र. एम.एच. ४० बि.एल. ४०७१ चा चालक नामे अजय भाऊरावजी भोवरे, वय ४० वर्षे, रा. बिबिसावळी, हिंगणा, नागपुर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पुतण्याचे दुचाकीला समोरून धडक दिल्याने, फिर्यादीचा पुतण्या गंभीर जखमी झाला, त्यास उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल मिहान येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी गजानन भाऊरावजी पिंपळे, वय ४७ वर्षे, रा. बिबिसावळी, कान्होलीबारा, हिंगणा, जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. सचिन इंगळे ७०६६५२५२२३ टाटा एन्ट्रा वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०५.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक ३१.०५.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, प्लॉट नं. ४०९, गणेश नगर, भरत कॉलोनी, रॉयल बिर्याणी सेंटर जवळ, कोतवाली, नागपुर येथे राहणारे फिर्यादी संकेत महेंद्र मनपिया, वय ३१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुंबई येथे बहीणीकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ४५,०००/–रू. तसेच, सोन्या दागिने व चांदीचे दागिने सिक्के असा एकुण किंमती २,८५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे मपोउपनि. शितल जासुद यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**
**( राहुल रोटे )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**